साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना :
KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

* सातारा * वर्ष १ * अंक १० * मराठी * सोमवार ३ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये

* Satara * Year 1 * Volume 10 * Marathi * Monday 3 August to 9 August 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.


## प्रोसीडिंगवरून सत्ताधारी-विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी

### सेस फंडाच्या वाटपावरून कराड पंचायत समितीत पहिल्यांदाच सभात्याग! : धरणे आंदोलनासह घोषणाबाजी



**कराड (हॅलो न्यूज)**

कराड पंचायत समितीची शुक्रवारी झालेली मासिक सभा चांगलीच वादळी ठरली. विरोधी अकरा सदस्यांनी केलेल्या सभात्यागाने सभा चांगलीच गाजली. पंचायत समिती सेस फंडाचे चुकीचे पद्धतीने वाटप करणाऱ्या पंचायत समिती सभापती, गटविकास अधिकारी यांचा निषेध करत आक्रमक झालेल्या विरोधी गटातील अकरा सदस्यांनी सभात्याग करत थेट पंचायत समितीच्या प्रवेशद्वारावर धरणे आंदोलन केले. यावेळी जोरदार घोषणाबाजी देखील केली. यावेळी सभागृहात प्रोसीडिंगवरून सत्ताधारी-विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.

कराड पंचायत समितीतील यशवंतराव चव्हाण सभागृहात सभापती नंदा यादव यांच्या अध्यक्षतेखाली मासिक सभेला सुरुवात झाली. उपसभापती अनिता वेताळ, गटविकास अधिकारी प्रताप पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ग्रामविकास व वित्त विभागाच्या आढाव्या दरम्यान सेस फंडातून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कडबाकुट्टी, ताडपत्री, औषध फवारणी पंप आदी साहित्याच्या लाभाच्या वाटपाचा मुद्दा उपस्थित झाला. सभापतींनी वाटप कसे होईल हे जाहीर केल्यावर सदस्य संग्राम पवार, नितीन थोरात, रवींद्र बडेकर, सिध्दार्थ चव्हाण, दिनेश कुंभार यांनी सर्व सदस्यांना समान लाभ देण्याची मागणी केली. मात्र, सभापती नंदा यादव यांनी त्यासंदर्भातील निर्णय लवकर जाहीर केला नसल्याने विरोधी गटाच्या सदस्यांनी आक्षेप घेत अर्ज मागवून लकी ड्रॉ काढा किंवा निवडीचे अधिकार सभापतींना द्यावेत, अशी मागणी केली. शासनाचा निधी कोणा एकाच्या मालकीचा नसून, त्यावर सर्वांचा समान अधिकार आहे. समान धोरण राबवणार नसाल तर सभागृहात थांबणार नाही, अशी भूमिका घेत विरोधकांनी सभात्याग केला. आणि पंचायत समितीच्या प्रवेशद्वारासमोर धरणे आंदोलन सुरू केले.

विरोधक सदस्यांनी सभात्याग केल्यानंतर सभा पुन्हा सुरु झाली. यावेळी जिल्हा परिषद बांधकाम, लघु पाटबंधारे, कृषी, आरोग्य, पशुसंवर्धन, सार्वजनिक बांधकाम, एस.टी. महामंडळ व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आढावा सादर केला.

**विरोधकांच्या सभात्यागानंतरही अंदाजपत्रक मंजूर**

सेस फंडाच्या लाभ वाटपावरून विरोधकांनी सभात्याग केल्यानंतरही सत्ताधारी सदस्यांच्या उपस्थितीत सभागृहाचे कामकाज सुरू राहिले. सभापती, उपसभापती, तसेच उपस्थित सत्ताधारी सदस्यांनी चर्चा केल्यानंतर सभापती नंदाताई यादव यांनी सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली.



## कोयना धरणाचे दरवाजे सहा फुटांवर

### नदीपात्रात ३२ हजार ७७६ क्युसेस विसर्ग सुरू : शनिवारी दिवसभर पावसाची रिमझिम

**कराड (हॅलो न्यूज)**

कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये चालू असणाऱ्या मुसळधार पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये वाढ होत होती कोयना धरणामध्ये शुक्रवारी एक ऑगस्ट रोजी ९०.५७ टीएमसी पाणीसाठा म्हणजेच ८६.०५% पाणीसाठा झाला होता. कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे सहा फुटाणे उचलण्यात आले असून ३२ हजार ७७६ क्यूसेस विसर्ग कोयना नदीपत्रात सोडण्यात आला आहे.

कोयना धरणामध्ये सद्यस्थितीत ९०.५७ टीएमसी पाणीसाठा असून छत्रपती शिवाजी महाराज जलसागरमध्ये ४९ हजार ७३८ क्युसेस पाण्याची आवक आहे. जलाशयामध्ये १.६१ टीएमसी पाण्याची आवक आहे. नवजा व कोयना या ठिकाणी शनिवारी दिवसभर पावसाचे प्रमाण कमी होते परंतु शुक्रवारी रात्री पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कोयना धरण्यातून विसर्ग वाढवण्यात आला होता.

कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये सुरू असणाऱ्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये वाढ होत होती. या अनुषंगाने कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे चार फुटावरून सहा फुटापर्यंत उघडून ३२ हजार७७६ क्युसेस विसर्ग कोयना नदी पत्रामध्ये सोडण्यात आला. कोयना धरणाच्या पायथ्या विद्युत ग्रहाचे एक युनिट सुरू असून त्याद्वारे १ हजार ५० क्युसेस विसर्ग कोयना नदीमध्ये सुरू आहे. एकूण विसर्ग ३३ हजार ८२६ क्युसेस सुरू आहे.

पावसाच्या प्रमाणानुसार व येणाऱ्या पाण्यानुसार सांडव्यावरून विसर्ग वाढवला जाऊ शकतो अशी माहिती धरण प्रशासनाकडून देण्यात आलेली आहे. धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदीच्या पाण्याची पातळी वाढत आहे नदीपत्राजवळील नागरिकांना सतरतेचा इशारा प्रशासनाच्या माध्यमातून देण्यात आलेला आहे.

## ३७ वर्षांची अखंड समाजसेवा ; डॉ.सुधीर कुंभार यांनी १४२ महिलांना दिली जटामुक्ती

**विशाल वामन पाटील (हॅलो न्यूज)**

अंधश्रद्धा, गैरसमज आणि सामाजिक उपेक्षेमुळे जटांच्या समस्येला सामोरे जाणाऱ्या महिलांना सन्मानाने जगण्याचा मार्ग मिळवून देण्यासाठी समाजसेवक सुधीर कुंभार यांनी गेली तब्बल ३७ वर्षे जटा निर्मूलनाच्या चळवळीत सातत्याने कार्य केले आहे. १९८९ पासून सुरू झालेल्या या मोहिमेत त्यांनी महाराष्ट्रासह कर्नाटकातील अनेक महिलांच्या जटा सोडवून त्यांना नवजीवन दिले आहे.

**(जागर..)**

कराड येथील मानवेंद्रनाथ रॉय अनौपचारिक शिक्षण आणि संशोधन संस्था यांच्या माध्यमातून या कार्याची सुरुवात झाली. त्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या रयत विज्ञान परिषदेमार्फत विज्ञानप्रसार आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यही त्यांनी पुढे नेले. जटा निर्मूलनाची चळवळ अधिक व्यापक व्हावी यासाठी त्यांनी शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवती आणि नव्या कार्यकर्त्यांना विशेष प्रशिक्षण देऊन सक्षम केले. आज अनेक प्रशिक्षित कार्यकर्ते स्वतंत्रपणे जटा निर्मूलनाचे काम करत आहेत.

डॉ.सुधीर कुंभार यांनी दोन वर्षांच्या बालिकेपासून ते सत्तरी ओलांडलेल्या ज्येष्ठ महिलांपर्यंत विविध वयोगटातील महिलांच्या जटा सोडवल्या आहेत. आतापर्यंत त्यांनी सुमारे १४२ महिलांची जटामुक्ती केली असून प्रत्येक प्रकरण वेगळे असल्याने त्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करून सामाजिक समुपदेशनासह जटा सोडविण्याचे काम केले आहे. जटांमुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम दूर करून संबंधित महिलांना सन्मानाने समाजात वावरता यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.



जटा निर्मूलनाबाबत समाजात जागृती निर्माण करण्यासाठी विविध ठिकाणी कार्यक्रम, प्रबोधनपर व्याख्याने आणि अंधश्रद्धा निर्मूलन मोहिमा राबविल्या जात आहेत. या कार्यक्रमांमुळे किंवा प्रसारमाध्यमांतील बातम्या, लेख आणि सामाजिक माध्यमांवरील छायाचित्रे पाहून अनेक कुटुंबे स्वतःहून संपर्क साधतात. त्यानंतर सुधीर कुंभार आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी जाऊन समुपदेशन करून जटा निर्मूलनाचे काम करतात.

या दीर्घ अनुभवावर आधारित जटामुक्ती: जटांच्या जोखडातून मुक्ती हे मराठीतील महत्त्वपूर्ण पुस्तक मनोविकास प्रकाशनाने सुधीर कुंभार प्रकाशित केले आहे. प्रत्यक्ष चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अनुभवातून लिहिले गेलेले हे मराठीतील पहिले पुस्तक मानले जाते. या पुस्तकात जटांमुळे होणारे परिणाम, समाजपरिवर्तनाची प्रक्रिया आणि विविध सत्य घटनांद्वारे जटा निर्मूलनाचा प्रवास मांडण्यात आला आहे. संबंधित महिलांची गोपनीयता जपण्यासाठी कोणाच्याही नावाचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

सुधीर कुंभार यांच्या सातत्यपूर्ण कार्यामुळे शेकडो कुटुंबांमध्ये अंधश्रद्धेऐवजी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजला असून जटामुक्त झालेल्या महिलांपैकी कोणालाही पुन्हा जटांचा त्रास झालेला नसल्याचे त्यांच्या अनुभवातून समोर आले आहे. समाजप्रबोधन, विज्ञाननिष्ठ विचार आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचा संगम असलेले त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

यांच्या टीम मध्ये उंडाळे येथील श्री. सुहास पाटील, कराडचे श्री. अलकेश ओहळ, श्री. राजेंद्र कदम सातत्याने त्यांच्या जटा निर्मूलन कार्यात असतात. याचबरोबर नवीन जटा निर्मूलन फळीतील विद्यार्थी व युवक कार्यकर्ते तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याचे काम वेळोवेळी करत असतात यातून अनेक विद्यार्थी या कार्यात जोडले गेले आहेत.

संपादकीय

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : संघर्षाला शब्द, समाजाला दिशा

मराठी साहित्यविश्वात आणि सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे एक तेजस्वी पर्व आहे. उपेक्षित, वंचित आणि कष्टकरी समाजाच्या वेदनांना शब्द देणारा हा लोककलावंत आजही तितकाच जिवंत वाटतो. त्यांच्या लेखणीतून व्यक्त झालेला संघर्ष हा केवळ साहित्याचा विषय नव्हता, तर सामाजिक न्यायाच्या लढ्याचा घोष होता. म्हणूनच अण्णाभाऊ साठे यांना ''लोकशाहीर'' ही उपाधी केवळ सन्मानाची नव्हे, तर जनतेने दिलेली मान्यता आहे.

''पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकरी आणि श्रमिकांच्या तळहातावर पेलली आहे,'' हा त्यांचा विचार आजही समाजाला वास्तवाची जाणीव करून देतो. श्रमाला प्रतिष्ठा देणारा आणि माणसाला केंद्रस्थानी ठेवणारा हा दृष्टिकोन भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा देणारा ठरला. शिक्षणाची संधी मर्यादित असतानाही जीवनाच्या विद्यापीठातून त्यांनी घेतलेले अनुभव त्यांच्या साहित्याचा पाया बनले.

अण्णाभाऊ साठे यांनी कथा, कादंबरी, पोवाडे, लावण्या, लोकनाट्य अशा विविध साहित्यप्रकारांतून सामान्य माणसाचे जीवन जिवंत केले. त्यांची फकिरा ही कादंबरी अन्यायाविरुद्ध उभ्या राहणाऱ्या स्वाभिमानी माणसाचा इतिहास सांगते. त्यांच्या प्रत्येक कलाकृतीत संघर्ष आहे, विद्रोह आहे आणि परिवर्तनाची आस आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य हे केवळ वाचनापुरते मर्यादित राहत नाही, तर विचारांना चालना देणारे ठरते.

आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात समाज झपाट्याने बदलत असला, तरी सामाजिक विषमता, जातीय भेदभाव, बेरोजगारी आणि श्रमिकांचे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. अशा वेळी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य अधिक प्रासंगिक ठरते. समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा आग्रह धरणारी त्यांची भूमिका आजच्या पिढीने समजून घेणे गरजेचे



## कारगील विजय दिवस निमित्त कराडात शहिद जवानांना मानवंदना

**कराड, प्रतिनिधी**

१९९९ मध्ये लडाखमधील उत्तर कारगिल जिल्ह्यातील पर्वत शिखरांवर पाकिस्तानी सैन्याला त्यांच्या ताब्यातील स्थानावरुन हुसकावून लावण्यासाठी झालेल्या कारगिल युद्धात २६ जुलै रोजी भारताचा विजय झाला.

या विजयाप्रित्यर्थ कराड मध्ये, आज २६ जुलै विजय दिवस समारोह समितीच्या वतीने, विजय चौकात, शहिदांच्या स्मृती स्तंभावर कराड तालुक्याच्या उपविभागीय पोलिस अधिकारी राजश्री पाटील यांच्या शुभहस्ते पुष्पचक्र वाहून मानवंदना देण्यात आली.

यावेळी भारत माता की जय, जय जवान, जय किसान, अमर रहे, अमर रहे शहिद जवान अमर रहे. या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

पोलीस उपअधीक्षक राजर्षी पाटील, ॲड संभाजीराव मोहिते व विलासराव जाधव यांनी कारगील युद्धाविषयी मनोगत व्यक्त केली.

विजय दिवस समारोह समितीचे उपाध्यक्ष अरुण जाधव, उद्योजक सलिम मुजावर, विनायक विभुते, ॲड संभाजीराव मोहिते, कराड शहर पोलीस प्रमुख दत्तात्रय दराडे, विलासराव जाधव, नगरसेवक विजय वाटेगावकर, प्राचार्य गणपतराव कनसे, प्रा. बी. एस. खोत, रत्नाकर शानभाग, रमेश पवार, प्रा. सतिश उपळाविकर, सौ. सरोजिनी मोहिते, ऐश्वर्या पाटणकर, महेंद्र भोसले, जालिंदर काशीद, आजी माजी सैनिक, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजय दिवस समारोह समितीचे संस्थापक अध्यक्ष कर्नल संभाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी २६ जुलै कारगील विजय दिवस साजरा करण्यात येतो, व शहिद जवानांना मानवंदना दिली जाते.

# हिपॅटायटिस वेळेवर ओळखला तर टाळता येतो; तपासणी आणि लसीकरणावर भर

## जागतिक हिपॅटायटिस दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न

**सातारा, जिमाका**

जागतिक हिपॅटायटिस दिनानिमित्त जिल्हा शासकीय रुग्णालय, सातारा येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी चला, हिपॅटायटिसबाबतचे गैरसमज दूर करूया या जागतिक संकल्पनेनुसार हिपॅटायटिसविषयी जनजागृती, तपासणी आणि लसीकरणाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अतुल लिपारे अति. जिल्हा शल्यचिकित्सक यांनी नागरिकांना हिपॅटायटिसची वेळेत तपासणी करून घेण्याचे आवाहन केले. हिपॅटायटिस हा अनेकदा लक्षणे न दिसणारा, लपून राहणारा आजार आहे. त्यामुळे जनजागृती, नियमित तपासणी आणि वेळेवर उपचार हाच या आजारापासून बचावाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. हिपॅटायटिसमुळे यकृतावर गंभीर परिणाम होऊन लिव्हर सिरोसिस आणि लिव्हर कॅन्सरचा धोका वाढू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने तपासणी करून आवश्यकतेनुसार लसीकरण करून घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

या विशेष उपक्रमांतर्गत आरोग्य कर्मचाऱ्यांचे हिपॅटायटिस लसीकरण, जिल्हा कारागृहातील बंदीजनांची तपासणी व लसीकरण, गरोदर मातांची तपासणी तसेच विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजातील प्रत्येक घटकाच्या सक्रिय सहभागातूनच हिपॅटायटिसमुक्त समाजाची निर्मिती शक्य असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्धाटनप्रसंगी प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ उल्का झेंडे , अति. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अतुल लिपारे, निवासी वैद्यकीय अधिकारी तथा कावीळ नियंत्रण विभागाच्या नोडल अधिकारी डॉ स्मिता लोंढे, सहाय्यक अधिसेविका प्रतिभा चव्हाण तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंत भोसले उपस्थित होते.

कार्यक्रमाची अंमलबजावणी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सूत्रसंचालन विकास शेंडगे यांनी केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार राष्ट्रीय विषाणूजन्य हिपॅटायटिस नियंत्रण कार्यक्रम लॅब टेक्निशियन रुपाली कदम यांनी मानले.

# 'अण्णासाहेब पाटील'च्या लाभार्थ्यांना न्याय द्या

## मराठा क्रांती मोर्चाचे ना. विखे-पाटील यांना निवेदन; कर्जप्रक्रियेतील अडथळे, प्रलंबित व्याज परतावा, 'होल्ड-रिजेक्ट' प्रकरणे व जाचक अटी दूर करण्याची मागणी

**कराड, प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन दिले.



या निवेदनात, महामंडळाच्या योजनांमधून लाभ घेतलेल्या अनेक लाभार्थ्यांना मागील वर्षभरापासून व्याज परतावा मिळालेला नाही. तसेच विविध कारणांमुळे अनेक प्रकरणे 'होल्ड' किंवा 'रिजेक्ट' केली जात असून, ती पूर्ववत करण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

नवीन कर्जप्रकरणांसाठी लागू करण्यात आलेल्या जाचक अटींमुळे पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे शासनाने प्रलंबित व्याज परतावा तातडीने वितरित करावा, 'होल्ड' व 'रिजेक्ट' केलेली प्रकरणे सुलभ प्रक्रियेद्वारे फेरतपासणी करून मंजूर करावीत, तसेच नवीन कर्जप्रकरणांवरील जाचक अटी तातडीने शिथिल कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय लाभार्थ्यांना त्रासदायक ठरणाऱ्या पोर्टलमधील व प्रशासकीय प्रक्रियेतील त्रुटी दूर करून पारदर्शक आणि सुलभ कार्यपद्धती लागू करावी, अशीही मागणी मोर्चाच्या वतीने करण्यात आली. मराठा समाजातील युवक-उद्योजकांच्या भवितव्याचा विचार करून या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# कोयना धरण छ. शिवाजी महाराज कोयना जलसागर नावाने ओळखले जाणार : राधाकृष्ण विखे पाटील

**सातारा, जिमाका**

पश्चिम महाराष्ट्राला वरदान ठरलेल्या कोयना जलसागराचे नामांतर छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे करण्याचा महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला



असल्याची माहिती जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल आभार व्यक्त केले आहेत.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत पुढाकार घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जलशयाचे नामांतर करण्याबाबत विनंती केली होती. शासनाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला असून कोयना जलसागरास छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे ओळखले जाईल.

* Satara * Vol- 10 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करून पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# कराड दक्षिणमधील दुबार, संशयित मतदार नोंदी वगळा

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**कराड (हॅलो न्यूज)**

२६०-कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार, स्थलांतरित व संशयित मतदार नोंदी असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करत माजी मुख्यमंत्री तथा २०२४ विधानसभा निवडणुकीतील कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज चव्हाण यांनी सातारा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे विशेष तपासणी करून नियमबाह्य नोंदी वगळण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भातील निवेदन सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नामदेवराव पाटील यांनी जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सादर केले. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत नामदेवराव पाटील यांनी निवेदनातील मुद्द्यांची सविस्तर माहिती दिली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस राजेंद्र शेलार, जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सुषमाराजे घोरपडे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अन्वरभाई, जिल्हा काँग्रेस कमिटीचे खजिनदार बाबासाहेब कदम, पं स सदस्य रविंद्र बडेकर, मुजीरभाई बागवान, मनोजकुमार तपासे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

नामदेवराव पाटील म्हणाले की, विधानसभा निवडणुकीपूर्वीही पृथ्वीराज चव्हाण यांनी वेळोवेळी लेखी स्वरूपात दुबार मतदारांची माहिती निवडणूक प्रशासनाकडे सादर केली होती. मात्र, त्यावर अपेक्षित कार्यवाही न झाल्याने हा प्रश्न अद्याप कायम आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या संगणकीय विश्लेषणानुसार कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील २१,१३२ मतदारांची नावे तब्बल ४८,७४१ वेळा नोंद झालेली आढळून आली असून, त्यामुळे सुमारे २७,६०९ दुबार नोंदी असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.



याशिवाय कराड दक्षिणला लागून असलेल्या कराड उत्तर, इस्लामपूर, शिराळा, पाटण आणि पलूस-कडेगाव या पाच विधानसभा मतदारसंघांतील २८,५०९ मतदारांची नावे कराड दक्षिण मतदार यादीतही नोंद झाल्याचा संशय असून, या सर्वांची पडताळणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. एकूण ५६,११८ संशयित दुबार अथवा स्थलांतरित नोंदींची सविस्तर यादी मतदाराचे नाव, मतदान केंद्र, भाग क्रमांक व अनुक्रमांकासह पेन ड्राइव्हद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# कराड दक्षिणमध्ये ५ सिमेंट काँक्रीट बंधाऱ्यांसाठी २.१६ कोटींचा निधी

## आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांचा पाठपुरावा; जलयुक्त शिवारच्या कामांना मिळाली गती

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील कासारशिरंबे, साळशिरंबे व तुळसण या गावातील ५ सिमेंट काँक्रीट बंधाऱ्यांच्या कामांना जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २.१६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मंजूर झालेल्या या निधीमुळे संबंधित गावांमधील भूजल पातळी उंचावण्यास मदत होणार असून, त्याचा मोठा फायदा या भागातील शेतीला होणार आहे.



कराड दक्षिणमधील कासारशिरंबे, साळशिरंबे व तुळसण या गावांना दरवर्षी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते. शिवाय शेतीसाठी पाण्याअभावी अनेक अडचणीही निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्याकडे सिमेंट काँक्रीट बंधाऱ्याची कामे मार्गी लावण्याची मागणी केली होती.

# कठोर परिश्रम, योग्य दिशा व सकारात्मक दृष्टिकोनातूनच स्पर्धा परीक्षेत यश संपादन करता येते : एसपी निखिल पिंगळे

कराड (हॅलो न्यूज)

कठोर परिश्रम, योग्य दिशा व सकारात्मक दृष्टिकोनातूनच स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करता येते असे प्रतिपादन सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी शिक्षण मंडळ, कराड संचालित महिला महाविद्यालय कराड येथे लोकमान्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन करताना केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत बल्लाळ, उपप्राचार्य डॉ.पराग सोनटक्के, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश चिवटे, सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विलास सुर्वे यांनी केले. पोलीस अधीक्षक निखिल




पिंगळे यांचा सत्कार योगेश चिवटे यांच्या हस्ते तर कराडचे पोलीस निरिक्षक दत्तात्रय दराडे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. भरत बल्लाळ यांच्या हस्ते करण्यात आला. उद्घाटन कार्यक्रम यशस्वी करण्यास सहाय्यभूत सर्व घटकांचे आभार डॉ.प्रीतम मिसाळ यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.रेखा धुळप यांनी केले.

# यश मिळावयचं तर कष्टाशिवाय पर्याय नाही : पै. संतोष वेताळ

## सैदापूरच्या कुस्ती संकुलात गुरूपौर्णिमा साजरी

**कराड (हॅलो न्यूज)**

कुस्तीत अनेक पैलवांनानी आपलं आयुष्य खर्ची घालून नाव कमावले आहे. कोणत्याही क्षेत्रात तुम्हांला यश मिळवायचं असेल तर कष्टाशिवाय पर्याय नाही. शिष्यानी घेतलेली मेहनत, कष्ट आणि त्यातून मिळावलेल यश हेच गुरूची किर्ती ठरवत असते. गुरूपौर्णिमा साजरी करण्यासाठी दिवसाची नव्हे तर शिष्याच्या यशाची गुरूला गरज असते, असे प्रतिपादन हिंदकेसरी पै. संतोष वेताळ यांनी केले.

सैदापूर येथील कुस्ती संकुलात आयोजित गुरूपौर्णिमा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विनायक भोसले, विशाल पाटील, विनायक देवकुळे, पै. वैभव डोंब यांच्यासह कुस्ती संकुलातील मल्ल मोठ्या संख्येने उपस्थित



होते. उपस्थितांचा मल्लांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.



# कराड पालिकेच्या सभेत आमदार निधीवरून राडा

## घनकचऱ्याच्या पोस्टरनी सभागृहात वेधले लक्ष : सत्ताधारी आणि भाजपाच्या नगरसेवकांच्यात खंडाजंगी

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड पालिकेच्या सभेत सत्ताधारी आणि विरोधी भाजपाच्या नगरसेवकांनी घनकचरा प्रकल्पात बोगस बिले काढण्यात आली असून भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत स्वतंत्र कमिटी स्थापन करून चौकशीची मागणी केली. तर कराड शहरासाठी आमदार डॉक्टर अतुल भोसले यांच्या माध्यमातून मिळालेल्या निधीचा वापर राजकीय हेतून केला जात नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर यांनी केला. यावेळी सत्ताधारी आणि विरोधी भाजपाच्या नगरसेवकांच्यात जोरदार खंडाजंगी झाली, सभागृहात भाजपाच्या नगसेवकांनी पोस्टर झळकवत लक्ष वेधून घेतले.

# नीट परिक्षेतील अपयशाच्या नैराश्यातून विद्यार्थीनीची विषारी औषध घेऊन आत्महत्या

## साताऱ्यातील कराड तालुक्यातील शेरे येथील गावची विद्यार्थी

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड तालुक्यातील शेरे येथील समीक्षा दीपक पवार वय-१८ हिने नीट परीक्षेत अपयश आल्याच्या नैराश्यातून विषारी औषध प्राशन करून जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. समीक्षाला कराडच्या कृष्णा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्यानंतर सोमवारी तिचा मृत्यू झाला. समक्षाने गेल्या वर्षीची नीट परीक्षा तिने दिली होती. निकालात अपयश



आल्याने ती मानसिक तणाव आणि नैराश्यात होती. त्याच अवस्थेत तिने २३ जुलै रोजी उंदरांना मारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विषारी वड्या खाल्ल्या. मात्र, ही बाब तिने सुरुवातीला घरातील कोणालाही सांगितली नव्हती.

त्यानंतर दोन दिवसांनी विषाचा परिणाम शरीरावर होऊ लागल्याने तिला तीव्र पोटदुखीचा त्रास सुरू झाला. त्यावेळी तिने घडलेला प्रकार कुटुंबीयांना सांगितला. त्यानंतर नातेवाईकांनी तातडीने २६ जुलै रोजी तिला कराड येथील कृष्णा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच सोमवारी तिची प्राणज्योत मालवली. स्पर्धा परीक्षांतील अपयशामुळे विद्यार्थ्यांवर वाढत असलेल्या मानसिक ताणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास मसूर पोलीस करीत आहेत.

# राष्ट्रीय महामार्गावरील कंपनीच्या गोडाऊनवर चोरट्यांचा डल्ला

**कराड (हॅलो न्यूज)**

सातारा-कागल राष्ट्रीय महामार्गाच्या तीनपदरीकरणाच्या कामाला चोरट्यांनी लक्ष्य करत वनवासमाची (ता. कराड) येथील कंपनीच्या खुल्या गोडाऊनवर रात्रीच्या अंधारात डल्ला मारला. चोरट्यांनी २२ लोखंडी ॲडॉप्टर प्लेट आणि १७४ मीटर इलेक्ट्रिक फ्लेक्सिबल वायर असा २३ हजार ६०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली असून, तळबीड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कराड अर्बन बँकेची १०९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

## सभासदांना ९% लाभांश जाहीर : समीर जोशी

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड अर्बन बँकेची १०९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि.२८जुलै २०२६ रोजी कराड येथील पंकज मल्टिपर्पज हॉल येथे उत्साहपूर्ण, शिस्तबध्द व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष समीर जोशी हे होते. यावेळी अर्बन कुटुंबप्रमुख व ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी, माजी अध्यक्ष डॉ. सुभाष एरम, बँकेचे उपाध्यक्ष शशांक पालकर, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल लाहोटी, मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. धनंजय शिंगटे आणि सर्व संचालक तसेच सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सभेमध्ये मार्गदर्शन करताना अर्बन कुटुंब प्रमुख सुभाषराव जोशी म्हणाले, आजचे युग झेन-झीचे आहे. त्यामुळे बँकदेखील या नव्या पिढीच्या गरजा नेमक्या ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत आहे. खाजगी बँकांप्रमाणेच आपणही सर्व सुविधा डिजीटल व ऑनलाईन देणार आहोत. त्यासाठी नजीकच्या काळात नवनवीन व अद्ययावत सॉफ्टवेअर्स कार्यरत करण्यासाठी आपण सज्ज झालो आहोत. बँकेत सध्या २५००० पेक्षा अधिक ग्राहक यू.पी.आय.च्या माध्यमातून ५५००० पेक्षा अधिक व्यवहार दररोज करीत आहेत आणि दिवसेंदिवस त्यामध्ये वाढ होत आहे. जास्तीत जास्त सभासद, ग्राहकांना डिजीटल करण्याचे ध्येय येत्या वर्षात ठेवले आहे.

बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. सुभाष एरम म्हणाले, स्व. कै. डॉ. द. शि. एरम व अर्बन कुटुंबप्रमुख सुभाषराव जोशी (भाऊ) यांच्या विचारधारेवरच बँकेची वाटचाल सुरू असून आजमितीस बँकेने रु.६५०० कोटींच्या पुढे व्यवसायाची मजल मारली आहे. गत २० वर्षामध्ये संचालक मंडळामध्ये आम्ही बदल करून तरूण नेतृत्त्वाची फळी निर्माण केली आणि त्याचाच एक भाग म्हणून अध्यक्षपदी समीर जोशी आणि उपाध्यक्षपदी शशांक पालकर यांची निवड करून या नव्या सक्षम नेतृत्त्वाकडे जबाबदारी सोपविली आहे. माझ्या २२ वर्षांच्या प्रदीर्घ अध्यक्षीय कारकिर्दीत पारंपरिक बँकिंगला न्याय देत बँकिंग क्षेत्रातील डिजीटल तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठीदेखील उत्तम प्रयत्न झाले. मला संचालक मंडळानेदेखील एकदिलाने साथ दिली, त्यामुळे बँकेची ही प्रगती आम्ही एक एकसंध टीम म्हणून साध्य करू शकलो आहोत.

व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल लाहोटी म्हणाले, केंद्र व राज्य सरकारच्या सबसिडी मिळणाऱ्या विविध ११ हून अधिक कर्ज योजना आपल्या बँकेमध्ये कार्यान्वित असून कर्ज आधारित भांडवली अनुदान आणि नाबार्डच्या विविध योजनांचा समावेश आहे. सबसिडीच्या या विविध योजनेद्वारे आतापर्यंत रु.२० कोटीपर्यंतचे अनुदान ग्राहकांना मिळाले आहे. मार्च २०२६ अखेरीस एकूण ७२ शाखांपैकी ५२ शाखांचा एन.पी.ए. शून्य टक्के असून निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण शून्य टक्के इतके राहिले आहे. बँकेच्या ७२ शाखांपैकी एकूण ५८ शाखांनी नफा मिळवला असून ३२ शाखांना रु.१ कोटींपेक्षा अधिक नफा झाला आहे. नव्याने सुरू केलेल्या ५ शाखांनी ६ महिन्यांमध्ये सुमारे रु.५० कोटींचा व्यवसाय आणि२५०० पेक्षा अधिक ग्राहक बँकेच्या व्यवहारामुळे नव्याने जोडले गेले आहेत. बँकेवर समाजातील सर्व घटकांचा असणारा अढळ विश्वास याद्वारेअधोरेखित झाला आहे.

बँकेचे अध्यक्ष समीर जोशी म्हणाले, बँकेने व्यवसायवृद्धीची परंपरा कायम राखत यंदाही बँकेच्या आजवरच्या इतिहासातील विक्रमी म्हणजेच रु.७४८ कोटींची व्यवसायवाढ सप्टेंबर २०२५ नंतर केवळ सहाच महिन्यांच्या कालावधीत अतिशय नियोजनबद्धरीत्या साध्य केली आहे. एकूण ठेव व्यवहारांनी रु.४००० कोटींचा टप्पा ओलांडला. कर्जव्यवहार रु.२५८५ कोटींचे राहिले आहेत. बँकेला एकूण रुपये ७०.०४ कोटीचा ढोबळ तर आयकर व तरतुदी वजा जाता २६.५२ कोटीचा निव्वळ नफा झाला आहे.प्रतिकूल परिस्थितीत देखील बँकेने आपली नफाक्षमता सिद्ध करीत बँकेने सातत्यपूर्णरीतीने प्रभावी वसुली प्रक्रिया राबविल्याने नक्त एन.पी.ए.चे प्रमाण शून्यतम पातळीवर राखले आहे.

आपली बँक ECBA(Eligibility Criteria for Business Authorization) निकषांची पूर्तता करीत असल्यानेरिझर्व्ह बँकेच्या या नवीन निकषानुसार सध्याच्या कार्यरत असलेल्या एकूण शाखांच्या १५% पर्यंत नवीन शाखा सुरू करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यादृष्टीने बँकेने नवीन शाखा विस्ताराचे नियोजन केले आहे. त्याचप्रमाणे बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र करण्याच्या महत्त्वपूर्ण पोटनियम दुरुस्तीला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि सहकार विभागाने मान्यता दिली असल्याने अन्य जिल्ह्यांच्या ठिकाणीदेखील आता कराड अर्बनच्या शाखा आपणास दिसतील.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुरूवातीस मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. धनंजय शिंगटे यांनी सभासदांचे स्वागत करून सभा सूचनेचे वाचन केले. गतवर्षापेक्षा अधिक निव्वळ नफा मिळवला असल्याने सभासदांना गतवर्षीपेक्षा अधिक एक टक्का अधिक म्हणजेच ९ टक्के लाभांश देण्याचा संचालक मंडळाच्या निर्णयास उपस्थित सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

बँकिंग क्षेत्रात डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर विचारात घेऊन तसेच खर्चातील बचतीद्वारे नफाक्षमतेत वाढ करून भविष्यात सभासदांना सातत्यपूर्णरीतीने उत्तम लाभांश देणे हेच आमचे ध्येय असल्याचे सांगत बँकेचे उपाध्यक्ष शशांक पालकर यांनी सभेच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानले.विषयपत्रिकेनुसार सभेपुढे सादर केलेल्या सर्व विषयांना सभासदांनी मान्यता देवून सर्व ठराव एकमताने मंजूर केले.

# गुडघाभर चिखलात उतरून प्रांत व तहसीलदारांनी घेतला भातरोपे लावणीचा आनंद

## शेतकरी व ग्रामस्थांमधून कौतूक

**पाटण (हॅलो न्यूज)**

पावसाळ्याच्या दिवसांत शेतशिवारात भात लावणीच्या कामांना वेग आला असून शेतकरी कुटुंबे शेतीच्या कामात व्यस्त झाली आहेत. शेतकऱ्यांच्या कष्टाची आणि पारंपरिक शेती पद्धतीची जवळून अनुभूती घेण्यासाठी पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव यांच्यासह पत्रकारांनी बोंद्री गावात चक्क शेतात उतरून भातरोपे लावणीचा आनंद घेतला. तसेच गुडघाभर चिखलात उतरून बैलजोडीच्या सहाय्याने चिखल मळणीचाही आनंद घेतला.



आपल्या व्यस्त कामातून शेतात चिखलात उतरून त्यांनी शेतकऱ्यांसोबत भातरोपे लावली. यावेळी भातरोपे लावणी करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, पावसाची परिस्थिती, शेतीकामासाठी लागणारे मनुष्यबळ तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत त्यांनी संवाद साधला. अधिकारी प्रत्यक्ष शेतात येऊन शेतकऱ्यांसोबत काम करत असल्याचे पाहून उपस्थित शेतकरी व ग्रामस्थांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

पाटण तालुक्यात भात हे प्रमुख पीक असून यावर्षी पावसामुळे भातलावणीच्या कामांना चांगली सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनाशी आणि ग्रामीण संस्कृतीशी घट्ट जोडलेल्या भातलावणीच्या कामात सहभागी होत प्रांताधिकारी आणि तहसीलदारांनी शेतीविषयीची आपुलकी आणि शेतकऱ्यांप्रती असलेली संवेदनशीलता दाखवून दिली. त्यांच्यासोबत पत्रकार विक्रांत कांबळे, शंकरराव मोहिते, जालिंदर सत्रे, नितीन खैरमोडे, विद्या नारकर आदी पत्रकारांनीही त्यांच्यासोबत भातरोपे लावणीचा प्रत्यक्षपणे अनुभव घेतला. याशिवाय भात लावणीनंतर चक्क शेताच्या बांधावर बसून नाचणीची भाकरी, ठेचा-पीठलं या जेवणाचा आस्वाद घेतला. त्यांच्या या सहभागाचे शेतकरी व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.



# खोडशी धरणाच्या उर्वरीत कामासाठी २ कोटी ६४ लाखांचा निधी

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत, राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी खोडशी (ता. कराड) येथे कृष्णा नदीवर असलेल्या नवीन गेटेड बंधाऱ्याच्या उर्वरित बांधकामासाठी २ कोटी ६४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. तसेच हे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी कराड दौऱ्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे तब्बल ४१ वर्षे रखडलेला खोडशी बंधाऱ्याच्या उर्वरित कामाचा प्रश्न आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांच्यामुळे मार्गी लागला आहे.

खोडशी (ता. कराड) गावाजवळ कृष्णा नदीवर ब्रिटीश कालखंडात सन १८६७ मध्ये जुन्या बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात आले होते. या बंधाऱ्यामुळे नदीपात्रात मोठा जलसाठा होऊन, या ठिकाणापासून निघणाऱ्या ६४ कि.मी. लांबीच्या कृष्णा कालव्याद्वारे कराड, वाळवा, पलूस व तासगाव तालुक्यामधील सुमारे ८,९७२ हेक्टर एवढे शेती क्षेत्र ओलिताखाली आले आहे. कृष्णा कालव्याद्वारे मिळणाऱ्या पाण्यामुळे हा भाग सुजलाम सुफलाम होण्यास मदत झाली आहे.

> सिंचनासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या खोडशी बंधाऱ्याच्या उर्वरित कामासाठी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी २.६४ कोटींचा निधी मंजूर केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. लवकरच या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले असून, हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने राबविला गेल्यास भविष्यात सुमारे १५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होणार आहे.
>
> - आ. डॉ. अतुलबाबा भोसले

# बिबट्या जीव वाचावायला गेला अन् जीवच गेला

## तासवडे एमआयडीसीत बिबट्याचा शॉक लागून मृत्यू

**तळबीड (हॅलो न्यूज)**

साताऱ्यातील तासवडे एमआयडीसी येथे बिबट्याचा वावर दिवसेंन दिवस वाढत असून पहाटे एक बिबट्या तासवडे एमआयडीसीतील लाईटच्या फिडर असलेल्या जाळीत अडकला होता. जाळीतून बाहेर निघण्यासाठी बिबट्या लाईटच्या फिडरवरती चढला अन् तेथून उडी मारण्याच्या प्रयत्न करताना शॉक लागून त्याचा जागीच मृत्यू झाला. बिबट्याला विजेचा शॉक लागताच शॉटसर्किट झाल्याने विद्युत पुरवठा खंडित झाला. त्यामुळे तात्काळ एमआयडीसीतील सुरक्षा रक्षकांनी फिडरकडे धाव घेतली असता त्यांना बिबट्या त्याठिकाणी अडकल्याचे दिसून आले. त्यानंतर वनविभाग तसेच तळबीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बिबट्याला खाली उतरून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.



वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी पाटण ग्रामीण २ कार्यालयाने दाखवलेली तत्परता आणि ग्राहकस्नेही काम यामुळे महावितरणची प्रतिमा उंचावली आहे, त्याबद्दल सर्व टीमचा पाटण उपविभाग कडून सत्कार करण्यात आला.

# अखेर ३० तासांनी पाटणमधील २० गावांत लाईट पोहचली

## वादळी वारा, पाऊस, दरीतून धाडसी कामाचे कौतुक

**कराड (हॅलो न्यूज)**

साताऱ्यातील पश्चिम घाट परिसरात गेल्या काही दिवसापासून मुसळधार पाऊस सुरू असून पाटण तालुक्यातील बोंद्री गावाजवळ मेन लाईनचा विद्युत पोल पडल्याने २० गावे अंधारात गेली होती. अखेर ३० तासांनी डोंगरद्‌यातील वादळी वाऱ्याचा सामना करत १५० फूट खोल दरीतून, ओढ्याच्या वाहत्या पाण्यातून वाट काढत दोरखंडाच्या सहाय्याने स्वतःचा जीव धोक्यात घालून महावितरणच्या २० कर्मचाऱ्यांनी विद्युत पुरवठा सुरळीत केला आहे. मणदुरे गावठाण मेन लाईनचा विद्युत पोल शुक्रवारी पडला होता. वादळी वारा, पाऊस, ओढ्यातील पाणी, १५० फूट खोल दरीत उतरून कर्मचाऱ्यांनी मोठ्या दोरखंडाने विद्युत वाहिन्या ओढत हा विद्युत पुरवठा सुरू केला आहे. या कर्मचाऱ्यांच्या धाडसाने २० गावात पुन्हा लाईटचा प्रकाश सुरू झाल्याने महावितरणच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे.